# नि.दि.मु.क्र. १५९/२०१४ मधील नि.५ वरील आदेश

(रामचंद्र जगदाळे वि. किसन जगदाळे)

१. प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ अन्वये प्रतिवादी नं.१ विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे

२. अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :—

दावा कलम १ मध्ये नमूद केलेली शेतजमीन व घर मिळकत वाद विषय आहे. प्रतिवादी नं.१ वादीचा भाउ व प्रतिवादी नं.२ व ३ त्यांच्या बहिणी आहेत. वादी व प्रतिवादी मूळ पुरुष संभाजी यांचे कायदेशिर वारस आहेत. संभाजी व त्यांची पत्नी खाशीबाई मयत आहेत. दावा मिळकत संभाजी व त्याचा सख्खा भाउ सखाराम यांच्या मालकीच्या व कब्जेवहिवाटीच्या होत्या. त्यांच्यामध्ये दावा मिळकतीचे तोंडी वाटप होवून प्रत्येकी आठ हाणे हिश्श्याने स्वतंत्र कब्जे वहिवाटी होत्या. सखाराम यांना मूलबाळ नसल्याने वादीने त्यांचा सांभाळ केला. त्यामुळे त्यांनी दावा मिळकतीतील त्यांचा वाटपाने मिळालेला हिस्सा दि. ०६/०७/१९९८ रोजी वादीचे नावाने केला. तेव्हापासून वादी सदर मिळकतीची मालकी हक्काने वहिवाट करत आहेत. त्यास प्रतिवादीने कोणतीही हरकत घेतली नाही.

३. प्रतिवादी नं.१ पोलीस खात्यामध्ये नोकरीस होता. तेथून सेवानिवृत्त झाल्यानंतर तो दावा मिळकतीमध्ये वडिलार्जित हिश्श्यामध्ये वादीसोबत समाईकात कब्जे वहिवाट करत होता. संभाजी यांच्या मृत्यूपश्चात दावा मिळकतीतील त्यांच्या हिश्श्याचे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. दावा मिळकतीपैकी क.ग.नं. ८१२/१३ या मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादींचा ५ आणे ४ पै वडिलार्जित हिस्सा पश्चिमेकडील बाजूस आहे. या गट नंबरमध्ये पूर्वेकडील सखाराम यांचा असणारा हिस्सा वादीचे वहिवाटीस आहे. त्यास लागून पूर्वेकडील ४ आणे इतके क्षेत्र वादीने ता. २८/०६/१९८५ रोजी खरेदी घेतलेला आहे. या दस्तानुसार संबंधित मिळकतीमध्ये वादीची मालकी हक्काने कब्जेवहिवाट आहे.

४. दावा मिळकतीपैकी वडिलार्जित हिश्श्यात वादीचा हक्क व अधिकार असल्याने त्यांनी प्रतिवादीकडे वाटप करुन मागितले असता प्रतिवादीने त्यास नकार दिला. वादीने दावा मिळकतीपैकी गट नं. ८१२/१३ या मिळकतीत खरेदी हिश्श्यामध्ये विहिर काढण्यासाठी खोदकाम करण्यास सुरुवात केली. परंतु, त्यास प्रतिवादी नं.१ ने हरकत अडथळा निर्माण केला. त्यामुळे वादीने प्रस्तुतच्या दाव्यात वाद मिळकतीतील वडिलार्जित हिश्श्याची वाटणी करुन मिळण्यासाठी व क.ग.नं. ८१२/१३ मध्ये त्याच्या स्वकष्टार्जित हिश्श्यामध्ये असणा—या विहिरीच्या कामास हरकत अडथळा करु नये म्हणून मनाई हुकूमाची मागणी केली आहे. दरम्यानच्या काळात प्रतिवादी नं.१ यांनी वादीच्या क.ग.नं. ८१२/१३ मधील खरेदी क्षेत्रात करत असलेल्या विहिरीचे कामास हरकत अडथळा करु नये म्हणून व वादीला मयत सखाराम यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्वतंत्र कब्जे वहिवाटीला हरकत अडथळा करु नये म्हणून तुर्तातूर्त मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

५. प्रतिवादी नं.१ तर्फे या अर्जाला म्हणणे व दाव्याला कैफियत (नि.२८) दाखल करुन अर्जातील कथने अमान्य केली आहेत व असे कथन केले आहे की, दावा मिळकती या वादी, प्रतिवादी नं.१ एकत्र कुटुंबासाठी एकत्रितपणे वहिवाटत होते. वादी, प्रतिवादी नं.१ यांचे वडिल संभाजी जगदाळे, त्यांचे भाउ सखाराम जगदाळे यांचे पूर्वीपासून अविभक्त असे हिंदू एकत्र कुटुंब होते. दावा मिळकतींचे सिटी सर्व्हे नंबर न दिल्याने त्यांची ओळख पटवणे शक्य होत नाही. मौजे कुमठे येथिल क.ग.नं. ८१२/१३ मध्ये वादी, प्रतिवादी नं.१ व शिवाजी भागवत वावरे यांची समाईक मालकी वहिवाट आहे. वादी व प्रतिवादी नं.१ हे सदर मिळकतीत सहहिस्सेदार आहेत. त्यामुळे वादींना सहहिस्सेदारांविरुध्द तुर्तातूर्त मनाई हुकूमाची मागणी करता येणार नाही. क.ग.नं. ८१२/१३ व ८१२/८ या जमिनीतून समाईकातील ४ आणेचा हिस्सा खरेदी घेण्यापूर्वी प्रतिवादी नं.१ ने या खरेदीपत्रासाठी आवश्यक प्रतिफलाची रक्कम रु.१०,०००/— नातेवाईक अरविंद कदम यांचेकडून हातउसने घेवून वादीस दिली व वादीच्या नावे दोन्ही मिळकतीचे खरेदीपत्र एकत्र कुटुंबासाठी केले. त्यामुळे सदर मिळकत वादीची एकटयाची नाही. परंतु, या

मिळकतीतील प्रतिवादीचा हक्क डावलण्यासाठी वादीने चुकीची विधाने केली आहेत. सन २००६ मध्ये वादीने प्रतिवादींना त्रास देण्यासाठी प्रतिवादी नं.१ विरुध्द फौ.ख.क्र. ८४७/२००६ दाखल केला होता. तसेच प्रतिवादी नं.१ ने वादी, त्याची पत्नी शालन व मुली यांचेविरुध्द केलेल्या तक्रारीनुसार फौ.ख.क्र. १०/२००६ दाखल केला आहे. तो अदयाप प्रलंबित आहे. त्यामुळे वादी प्रतिवादीला वरचेवर त्रास देत आहे. क.ग.नं. ८१२/१३ मध्ये एकूण २४ खातेदार असून त्यांना याकामी पक्षकार बनवले नाही. क.ग.नं. ८१२/१३ मधील हिस्सेदारांचे अदयाप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. वादीने प्रतिवादींच्या संमतीशिवाय क.ग.नं. ८१२/१३ मध्ये विहिर खोदकाम करण्यास सुरुवात केली आहे. प्रतिवादीने त्यास हरकत घेतली आहे. दावा मिळकतीतील हिस्सेदारांचे अदयाप वाटप झालेले नसल्याने व दाव्याला आवश्यक पक्षकार तसेच आवश्यक मिळकत समाविष्ट न केल्याची बाधा येत असल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. वादी व प्रतिवादी नं.१ तर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रे पाहिली. खालील मुददे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे निष्कर्ष मी त्या समोर खालील कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस शाबित केली आहे काय? | नाही. |
| २ | न्यायाचा झुकता तराजु वादीच्या बाजुने आहे काय ? | नाही. |
| ३ | अर्ज नामंजुर केल्यास वादीला अपरिमित हानी होईल काय? | नाही. |
| ४ | आदेश काय ? | अर्ज नामंजुर. |

## <u>कारणमीमांसा</u>

७. वादीतर्फे त्यांच्या युक्तिवादाच्या अनुषंगाने नि.३ व ३२ खालील

दस्तऐवजांवर, तसेच प्रतिवादीतर्फे नि.३४ वरील दस्तऐवजांवर भिस्त ठेवली आहे.

८. **<u>मुद्दा क्रमांक १ साठी</u> :—**

वादीतर्फे वकिलांनी युक्तिवादादरम्यान वादी व प्रतिवादींमधील वाद मूळ क.ग.नं. ८१२/१३ बाबत असल्याचे कथन केले व असा युक्तिवाद केला की, त्यांनी क.ग.नं. ८१२/१३ मध्ये खरेदी केलेल्या स्वकष्टार्जित जमिनीमध्ये विहिर खोदलेली आहे. वादीने प्रतिवादी नं.१ ला वडिलार्जित मिळकतीतील हिस्सा देण्यास कधीही नकार दिलेला नाही. प्रतिवादी नं.१ ने त्यांच्या म्हणण्यामध्ये तो दावा जमिनीची वहिवाट करत आहे असे नमूद केलेले नाही. प्रस्तुतचा अर्ज हा सहहिस्सेदारांविरुध्द दाखल केलेला नसून वादीने खरेदी केलेल्या मिळकतीसंदर्भात दाखल केलेला आहे. यापूर्वी संभाजी व सखाराम यांच्यामध्ये दावा जमिनीची तोंडी वाटणी झाली आहे. पूर्ण ग.नं. ८१२ ही दावा मिळकत नसून केवळ त्यातील एक पोटहिस्सा क.ग.नं. ८१२/१३ ही दावा मिळकत असल्याने इतर सहहिस्सेदारांना दाव्यात पक्षकार करण्याची आवश्यकता नाही. करिता त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

९. याउलट प्रतिवादी नं.१ तर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, संभाजी व सखाराम यांच्यामध्ये वाटणी झाल्याचा कोणताही दस्तऐवज वादीतर्फे दाखल करण्यात आला नाही. या वाटणीवेळी प्रतिवादी नं.२ व ३ अथवा त्यांची आई खाशीबाई हिला हिस्सा देण्यात आला नाही. फेरफार नं. ३०२८ व ३०२९ ने संभाजी व सखाराम यांच्या नावे असलेली मिळकत वादी व प्रतिवादी यांच्या नावे करण्यात आलेली आहे कारण त्यामुळे जादाची मिळकत सरकारजमा होवू नये. केवळ त्या नोंदीमुळे सखाराम व संभाजी यांच्यामध्ये तोंडी वाटप झाल्याचे सिध्द होवू शकत नाही. याउलट प्रतिवादी नं.१ ने सन १९८५ साली करण्यात आलेल्या खरेदी पत्रासाठी वादीला आर्थिक मदत केली आहे. त्यामुळे सदरची मिळकत ही एकत्र कुटुंबासाठी खरेदी केली आहे. अदयाप दावा मिळकतींमध्ये सरसनिरस मानाने वाटप झालेले नसल्याने वादी कोणत्याही ठराविक हिश्श्यामध्ये विहिर खोदकाम करु शकत

नाही अथवा त्याचा ताबा सांगू शकत नाही. करिता अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

१०. वादीने याकामी एकूण १३ शेतजमिन मिळकती व एक घर मिळकत दावा मिळकत म्हणून समाविष्ट केली आहे. त्या अनुषंगाने वादीतर्फे नि.३/१ ते ३/१४ खाली दावा मिळकतीचे ७/१२ उतारे व ८अ चा उतारा दाखल केला आहे. त्यापैकी क.ग.नं. १०६१ ला प्रतिवादी नं.१ च्या नावाची नोंद असून त्यामधील वादीच्या नावाला कंस करुन पुंडलिक मारुति जगदाळे यांच्या नावाची नोंद करण्यात आली आहे. वादीतर्फे याकामी फेरफार नं.७९६२ चा उतारा नि.३२/१ खाली दाखल केला आहे. त्याप्रमाणे वादीने क.ग.नं. १०६१ मधील त्याचा हिस्सा पुंडलिक मारुति जगदाळे यांना विक्री केल्याचे नमूद केले आहे. नि.३/२, नि.३/३, नि.३/४, नि.३/५, नि.३/६ वर अनुक्रमे दावा गट नं. १४२७, १४१५, १५८१, १५७९ व १५७७ चे ७/१२ उतारे दाखल केले आहेत. या सर्व मिळकतींना वादी व प्रतिवादी नं.१ यांच्या नावाची नोंद करण्यात आली आहे. परंतु, त्यापैकी क.ग.नं. १४७७ च्या ७/१२ उता—याला वादी व प्रतिवादींच्या नावे प्रत्येकी आठ आणे हिश्श्याची नोंद केली असून इतर सर्व ७/१२ उता—यांना आणेवारीची नोंद करण्यात आली नाही. तसेच क.ग.नं. १५२०, १५११ च्या ७/१२ उता—याला केवळ प्रतिवादी नं.१ च्या नावाची नोंद केलेली असून वादीच्या नावाची नोंद नाही. क.ग.नं. ८१२/१३, १५७८ या मिळकतींना वादी व प्रतिवादी नं.१ यांच्या नावाची इतर सहहिस्सेदारांसोबत नोंद करण्यात आली आहे. त्यावर प्रतिवादीच्या नावाची नोंद नाही. तसेच ग्रा.घर मिळकत नं. ११२ ला वादी व प्रतिवादींचे वडिल संभाजी यांच्या नावाची नोंद आहे. या मिळकतीला वादी अथवा प्रतिवादींच्या नावाची नोंद नाही.

११. वादीतर्फे याकामी नि.३/१५ खाली फेरफार नं. ३०२९ व प्रतिवादी नं.१ तर्फे याकामी नि.३४/२ खाली फेरफार नं.३०२९ दाखल केला आहे. या फेरफारानुसार खातेदार सखाराम यांनी दिलेल्या अर्जावरुन त्यासमोरील मिळकतींना वादीच्या नावाची नोंद करण्यात आली आहे. या खाते उता—यामध्ये क.ग.नं. १५२०

व १५११ ची नोंद करण्यात आली नाही. तसेच या खाते उता—याला संपूर्ण क.ग.नं. १५१९ व १५१० ची नोंद वादीच्या नावाने करण्यात आली आहे. उर्वरित मिळकतीमधील सखाराम तात्या जगदाळे यांच्या मिळकतीतील हिश्श्यास वादीच्या नावाची नोंद आहे. परंतु, सदरचा हिस्सा किती आणेवारी अथवा पै चा आहे याचा उल्लेख या फेरफार पत्रकामध्ये करण्यात आला नाही. त्याच दिवशी फेरफार नं. ३०२८ ची नोंद देखिल करण्यात आली आहे. प्रतिवादी नं.१ तर्फे नि.३४ खाली फेरफार नं. ३०२८ चा उतारा दाखल केला आहे. त्याप्रमाणे संभू तात्याबा जगदाळे यांनी अर्ज दिल्यावरुन त्या समोर नमूद असलेल्या मिळकतींना प्रतिवादी नं. १ च्या नावाची नोंद रुजू केली आहे. त्यामध्ये संपूर्ण क.ग.नं. १५११, १५२ ला प्रतिवादी नं.१ च्या नावाची नोंद असून उर्वरित मिळकतींपैकी संभू तात्याबा जगदाळे यांच्या हिश्श्याला प्रतिवादी नं.१ च्या नावाची नोंद करण्यात आली आहे.

१२. फेरफार नं. ३०२८ व ३०२९ ची नोंद दि. ०१/०६/८८ रोजी रुजू करण्यात आली असून या दोन्ही नोंदींना आजपर्यंत वादी व प्रतिवादींतर्फे हरकत घ ेतल्याचे दिसून आले नाही. या दोन्ही नोंदींना वादी व प्रतिवादी नं.१ च्या नावाची नोंद क्रमशः सखाराम तात्याबा व संभू तात्याबा जगदाळे यांच्या नमूद मिळकतीतील हिश्श्यांना करण्यात आली आहे. परंतु, या दोन्ही फेरफार पत्रकामध्ये सदरच्या मिळकती या संभू तात्याबा जगदाळे व सखाराम तात्याबा जगदाळे यांच्या स्वकष्टार्जित मालकी वहिवाटीच्या अथवा वडिलार्जित मिळकती आहेत याचा उल्लेख केलेला नाही. तसेच या फेरफार पत्राकामध्ये या मिळकतीचे सखाराम व संभू जगदाळे यांच्यामध्ये तोंडी वाटप झाले असून ते स्वतंत्रपणे या मिळकती वहिवाटत आहेत असा उल्लेख देखिल करण्यात आला नाही. त्यामुळे सदरच्या नोंदी कोणत्या आधारे घेण्यात आल्या आहेत यासंबंधीचा खुलासा वादीतर्फे करण्यात आला नाही.

१३. वादीच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीचे सखाराम व संभू यांच्यात तोंडी सरसनिरस मानाने वाटप झाले होते. परंतु, या वाटणीवेळी मयत खाशीबाई, प्रतिवादी नं.२ व ३ यांना हिस्सा देण्यात आला अथवा नाही या संबंधीचा

कोणताही उल्लेख वादीने त्याच्या कथनात केलेला नाही. तसेच फेरफार नं. ३०२८ व ३०२९ मध्ये देखिल याबद्दल कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. याउलट फेरफार नं.३०२८ मध्ये क.ग.नं. १५११ व १५२ मध्ये सखाराम तात्याबा जगदाळे यांचा हिस्सा असल्याचे नमूद केले नाही. तसेच फेरफार नं.३०२९ मध्ये क. ग.नं. १५१० व १५१९ मध्ये संभू तात्याबा जगदाळे यांचा हिस्सा असल्याचे नमूद केले नाही. तसेच या दोन्ही फेरफार पत्रकामध्ये त्यामधील नमूद सर्व मिळकतींमधील कोणता विशिष्ट हिस्सा वादी अथवा प्रतिवादी नं.१ यांना देण्यात आला ते देखिल नमूद करण्यात आले नाही. जर सखाराम व संभाजी यांच्यामध्ये दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप झाले असल्यास या सर्व मिळकतीच्या विशिष्ट चतु:सिमा अथवा त्यांच्या कोणत्याही एका दिशेकडील भाग या फेरफारपत्रकामध्ये नमूद केला असता. परंतु, सदर दोन्ही फेरफार पत्रकाचे अवलोकन केले असता त्यामध्ये नमूद मिळकतींपैकीचा हिस्सा संबंधितांना देण्यात आल्याची नोंद केली आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी संभाजी व सखाराम यांच्यामध्ये दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने तोंडी वाटप झाले होते असे दिसून येत नाही.

१४. वादीतर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादीने त्यांच्या म्हणण्यामध्ये दि. ०६/०७/१९८८ रोजी मयत सखाराम यांनी त्यांचा दावा मिळकतीमधील हिस्सा वादीच्या नावाने केल्याचे कथन नाकारले नाही. त्यामुळे सदरचा हिस्सा हा वादीच्या मालकी वहिवाटीचा असल्याचे सिध्द होत आहे. प्रतिवादी नं.१ ने त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जातील सर्व कथने अमान्य केली असून युक्तिवादादरम्यान असे कथन केले आहे की फेरफार नं.३०२८ व ३०२९ ची नोंद ही केवळ जादाची मिळकत सरकारजमा होण्यावर प्रतिबंध करण्यासाठी करण्यात आला आहे. परंतु, सदरची मिळकत ही अदयाप सरसनिरस मानाने वाटप झालेली नसून वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाची मिळकत आहे.

१५. वादींच्या कथनाप्रमाणे सदर मिळकतीचे तोंडी वाटप झाले असल्यास ही मिळकत सखाराम व संभाजी यांची स्वतंत्र मिळकत होवू शकली असती. परंतु,

अशा परिस्थितीत संभाजी यांनी प्रतिवादी नं.१ यांच्या नावे केलेली सर्व मिळकत त्यांची स्वतंत्र मिळकत असल्याने पुन्हा त्या हिश्श्यात वादी त्याचा हिस्सा मागू शकत नाही. परंतु, याउलट वादीने सखाराम यांच्याकडून प्राप्त झालेला हिस्सा हा त्याचा स्वतंत्र हिस्सा असून पुन्हा संभाजी यांनी प्रतिवादी नं.१ यांना दिलेल्या हिश्श्यातील स्वत:चा हिस्सा वेगळा करुन मागितला आहे व या हिश्श्यासंबंधी सदरची मिळकत त्याची वडिलार्जित असल्याचे कथन केले आहे. म्हणजेच अशा वेळी वादीला सखाराम यांच्याकडून प्राप्त झालेली मिळकत ही वडिलार्जित मिळकत होवू शकते. सदरची मिळकत फेरफार नं. ३०२८ शिवाय सखाराम यांना तोंडी वाटपाने मिळालेली आहे हे दाखवण्याकरिता अन्य कोणताही दस्तऐवज वादीने दाखल केलेला नाही. तसेच फेरफार नं. ३०२९ मध्ये देखिल सखाराम यांना त्या मिळकती तोंडी वाटपाने मिळाल्याचा उल्लेख केलेला नाही.

१६. प्रतिवादी नं.१ तर्फे वकिलांनी असा आक्षेप नोंदवला की, दावा मिळकतीच्या विशिष्ट चतु:सिमा नमूद न केल्यामुळे तसेच त्याच्या वर्णनामध्ये वडिलार्जित समाईक व स्वतंत्र हिस्सा असे नमूद केले असल्याने त्यांची नेमकी ओळख पटवता येत नाही. याउलट वादीतर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकतीच्या वर्णनात ज्या ठिकाणी वडिलार्जित समाईक हिस्सा नमूद केला आहे ती मिळकत मयत संभाजी यांच्या वडिलार्जित हिश्श्याचा भाग आहे व सदरची मिळकत वादी व प्रतिवादीची वडिलार्जित मालकी वहिवाटीची आहे. या व्यतिरिक्त जो हिस्सा वादीला मयत सखाराम यांच्याकडून प्राप्त झाला आहे, तो त्यांनी स्वतंत्र हिस्सा म्हणून दर्शवला आहे. तसेच क.ग.नं. ८१२/८ व ८१२/१३ मध्ये जो हिस्सा वादीने खरेदी केला आहे तो हिस्सा देखिल स्वतंत्र म्हणून नमूद केलेला आहे. त्यामुळे याकामी त्या मिळकतींची चतु:सिमा नमूद करण्याची आवश्यकता नाही.

१७. प्रतिवादी नं.१ तर्फे याकामी नि.३४/३ खाली दि. २६/०६/८९ चे खरेदीपत्र दाखल केले आहे. या खरेदीपत्राप्रमाणे वादीने तुकाराम बळी जगदाळे, शंकर बळी जगदाळे व पांडुरंग बळी जगदाळे यांच्याकडून क.ग.नं. ८१२/१३,

८१२/८ मधील समाईकात ४ आणे हिस्सा खरेदी केला आहे. यापैकी ग.नं. ८१२/८ यातील दक्षिणेकडील क्षेत्र व ग.नं. ८१२/१३ मधील पूर्वेकडील क्षेत्र एकूण ३१ आर र.रु. १०,०००/— देवून खरेदी केला आहे. प्रतिवादी नं.१ च्या म्हणण्याप्रमाणे सदर खरेदीपत्रासाठी त्यांनी नातेवाईक अरविंद कदम यांच्याकडून हातउसनी रक्कम घेवून ती वादीस दिली होती व त्यातून सदरची मिळकत एकत्र कुटुंबासाठी खरेदी केली होती. याच्या पुष्टीकरिता प्रतिवादी नं.१ तर्फे अरविंद कदम यांचे शपथपत्र दाखल केले नाही अथवा नि.३४/३ खालील खरेदीपत्रामध्ये देखिल याचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे सदरची मिळकत खरेदी करण्यासाठी प्रतिवादी नं.१ ने वादीला आर्थिक सहाय्य केले असे दिसून येत नाही. परंतु, या व्यतिरिक्त या खरेदीपत्रामध्ये खरेदी केलेल्या मिळकतींच्या चतु:सिमा नमूद केल्या नसून संपूर्ण क.सर्व्हे नं. ८१२/१३, ८१२/८ च्या चतु:सिमा नमूद केल्या आहेत. यातील समाईकातील चार आणे हिस्सा वादीने खरेदी केल्याचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे या खरेदीपत्रावरुन देखिल या दोन्ही मिळकतीतील ठराविक चतु:सिमेतील नमूद केलेला हिस्सा वादीने खरेदी केल्याचे दिसून येत नाही. तसेच खरेदी केलेल्या मिळकतीचे एकूण क्षेत्र ३१ आर नमूद केलेले असून दोन्ही मिळकतींचे खरेदी केलेले वेगवेगळे क्षेत्र नमूद केलेले नाही. त्यामुळे क.ग.नं. ८१२/१३ व ८१२/८ मध्ये समाईकातील ४ आणे हिश्श्याशिवाय वादीचा ठराविक हिस्सा कोणता आहे हे स्पष्ट झालेले नाही.

१८. प्रतिवादी नं.१ तर्फे याकामी क.ग.नं. ८१२ चा नकाशा नि.३४/४ खाली दाखल केला असून त्याचा जुना स.नं. १९२, १९४, १९५, १९६ होता असे नमूद केले आहे व त्या अनुषंगाने समाईक खाते नं.१९३ चा स्केलबुकचा उतारा (नि. ३४/५) दाखल केला आहे. या अनुषंगाने प्रतिवादी नं.१ तर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, नि.३४/५ खालील खातेउता—यातील सर्व सहहिस्सेदार असल्याने त्यांना दाव्यात पक्षकार म्हणून समाविष्ट करणे आवश्यक आहे तसेच क. ग.नं. ८१२ चे अदयाप पोटहिस्से पडले नसल्याने त्यामधील सर्व हिस्सेदारांना देखिल समाविष्ट करणे आवश्यक आहे. वादीतर्फे याकामी नि.३/९ व १० खाली क.ग.नं.

८१२/८, १३ चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. या उता—यांवरुन क.ग.नं. ८१२ चे पोटहिस्से पडले असल्याचे दिसत आहे. या दोन्ही ७/१२ उता—यांवर वादी व प्रतिवादींशिवाय शिवाजी भागवत वावरे यांच्या नावाची नोंद दिसून येत आहे. शिवाजी भागवत वावरे यांना याकामी पक्षकार केलेले नाही. परंतु, वादी व प्रतिवादींमधील वाद पाहता तो त्यांच्यामधील एकत्र कुटुंबाचा असल्याचे दिसत आहे. त्यामुळे या अर्जाच्या चौकशीकामी शिवाजी भागवत वावरे हे आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येत नाही. तसेच त्यांनी वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केल्याचे वादीचे कथन नाही. त्यामुळे देखिल क.ग.नं. ८१२ च्या सर्व हिस्सेदारांना या अर्जाच्या चौकशीसाठी पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याची आवश्यकता नाही.

१९. वादीतर्फे याकामी दाखल केलेल्या दावा मिळकतींच्या ७/१२ उता—यावरुन क.ग.नं. १५१९ व १५१० ला केवळ वादीच्या नावाची नोंद असल्याचे आढळून येत आहे. परंतु, वादीने स्वत: कथन केल्याप्रमाणे सदरची मिळकत त्यांची वडिलार्जित मालकी वहिवाटीची आहे. त्यामुळे केवळ या मिळकतींना प्रतिवादींच्या नावाची नोंद नाही म्हणून सदरची मिळकत वादीच्या एकटयाच्या मालकी वहिवाटीची आहे असे देखिल म्हणता येणार नाही. या व्यतिरिक्त क.ग.नं. १०६१, १५२० व १५११ ला प्रतिवादी नं.१ च्या नावाची नोंद करण्यात आली आहे. या मिळकतींना वादीच्या नावाची नोंद नसल्याने या मिळकतीची वहिवाट वादी करतो असेदेखिल प्रथमदर्शनी मानता येणार नाही. या व्यतिरिक्त क.ग.नं. १४२७, १४११, १५८१, १५७९, १५७७, ८१२/८, ८१२/१३, १५७८ या जमिनींना वादी व प्रतिवादी नं.१ ची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी नं.१ हे या मिळकतीतील सहहिस्सेदार असल्याचे दिसत आहे.

२०. वादीतर्फे वकिलांनी असा युक्तिवाद केला की, प्रस्तुतचा अर्ज हा त्यांच्या वडिलार्जित मिळकतीबद्दल नसून वादीने खरेदी केलेल्या मिळकतीबद्दल, तसेच त्यांना सखाराम यांच्याकडून प्राप्त झालेल्या मिळकतीबद्दल दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज हा सहहिस्सेदारांविरुध्द दाखल केलेला नाही. परंतु,

वादीने स्वत: दाखल केलेल्या ७/१२ उता—यांवरुन वादी व प्रतिवादींची नोंद या मिळकतींना एकत्रात रुजू झाल्याचे दिसत असून कोणत्याही ठराविक हिश्श्यासाठी त्यांची नोंद करण्यात आलेली नाही अथवा या मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप झाल्याचे दाखवण्यासाठी वादीतर्फे कोणताही दस्तऐवज दाखल केलेला नाही. तसेच दावा घर मिळकतीला देखिल वादी व प्रतिवादींच्या नावाची नोंद नसून त्यांच्या वडिलांच्या नावाची नोंद आहे. वडिलांच्या मृत्यूपश्चात सदरची घर मिळकत वादी अथवा प्रतिवादींमध्ये सरसनिरस मानाने वाटप करण्यात आली असे दाखवणारा कोणताही दस्तऐवज दाखल केला नाही. त्यामुळे दावा घर मिळकतींमध्ये देखिल वादी व प्रतिवादी नं.१ हे सहहिस्सेदार असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे वादी हा प्रतिवादी नं.१ विरुध्द सहहिस्सेदार या नात्याने तुर्तातूर्त मनाई हुकूमाची मागणी करु शकत नाहीत.

२१. वादीतर्फे वकिलांनी दावा दाखल करण्यापूर्वी प्रतिवादी नं.१ यांनी त्यांना पाठवलेली नोटीस व त्यांनी या नोटीसीस दिलेल्या उत्तराकडे लक्ष वेधून असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी नं.१ यांनी त्यांच्या नोटीसमध्ये संभाजी यांच्या नावावरील जमिनी प्रतिवादी नं.१ यांच्या एकटयाच्या नावाने घेण्यासाठी वादीने स्वत: अर्ज देवून या जमिनी त्यांच्या नावावर करण्यास संमती दिल्याचे नमूद केले आहे. तसेच सखाराम तात्याबा जगदाळे यांच्या नावावरील मिळकती वादीच्या नावे करण्यासाठी सन १९८८ साली अर्ज दिल्याचे देखिल नमूद केले आहे. त्यामुळें या मिळकतीतील हिस्सा फेरफार पत्रकाने वादी व प्रतिवादी नं.१ च्या स्वतंत्र हिश्श्यास रुजू झाला आहे. तेव्हापासून वादीच्या वहिवाटीस असलेल्या या मिळकतीला प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये म्हणून तुर्तातूर्त मनाई हुकूमाची मागणी केली आहे.

२२. वादीतर्फे या नोटीसीला उत्तर (नि.३२/३) ने दि. १७/१०/२०१३ रोजी देण्यात आले आहे. या उत्तर नोटिसीमध्ये देखिल वादीने सखाराम व संभाजी यांचेमध्ये दावा मिळकतीचे तोंडी वाटप झाल्याचे नमूद केले नाही. याउलट

त्यांनी सखाराम व संभाजी त्यांच्या शेत जमिनी फार पूर्वीपासून स्वतंत्रपणे करत होते असे नमूद केले आहे. या उत्तरामध्ये त्यातील नमूद मिळकतींचे विशिष्ट वर्णन केले नाही. तसेच वादीने दि. २६/०६/१९८९ च्या खरेदीपत्राने क.ग.नं. ८१२/१३ व ८१२/८ मध्ये समाईकातील ४ आणे हिस्सा खरेदी केला आहे. त्याचा स्वतंत्र ताबा मिळण्यासाठी वादीने इतर सहहिस्सेदारांविरुध्द दावा दाखल केलेला नाही. त्यामुळे या खरेदीपत्रावरुन देखिल क.ग.नं. ८१२/१३ व ८१२/८ मधील ठराविक भाग वादीच्या ताब्यात मिळाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे दाव्यातील नमूद मिळकतीत वादी व प्रतिवादी नं.१ हे सहहिस्सेदार असल्याने त्यातील ठराविक भाग वादीच्या ताब्यात आहे व त्या भागास प्रतिवादीने हरकत अडथळा करु नये अशी मागणी वादीला मागता येणार नाही. वादीने प्रथमदर्शनी दावा मिळकती त्यास मयत सखाराम यांच्याकडून प्राप्त झाली आहे व त्याच्या स्वतंत्र कब्जेवहिवाटीस आहेत हे दर्शवून न दिल्याने मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

२३. **<u>मुद्दा क्र.२ व ३ साठी</u>**

वादीने असे कथन केले आहे की तो दावा मिळकती पावसाच्या पाण्यावर वहिवाटतो. त्याला पाण्याचे पुरेसे साधन नाही. म्हणून क.ग.नं. ८१२/१३ या मिळकतीपैकी खरेदी हिश्श्यामध्ये पूर्वेकडील बाजूस विहिरीचे खोदकाम करण्यासाठी त्यांनी दि. ०३/०४/२०१४ रोजी सुरुवात केली. साधारणत: विहिरीचे खुदाई करण्याचे काम १५ ते २० फुटापर्यंत केले. त्यावेळी प्रतिवादी नं.१ ने तेथे येवून प्रस्तावित विहिरीचे काम थांबवले व वादीस शिवीगाळ व दमदाटी केली. प्रतिवादी नं.१ तर्फे असे कथन केले आहे की, वादीने त्याच्या संमतीविना व गैरहजेरीत क.ग.नं. ८१२/१३ मध्ये विहिर खोदण्याचे काम करण्यास सुरुवात केली. त्यामुळे प्रतिवादी नं.१ ने त्यास हरकत घेतली आहे. म्हणजेच प्रतिवादी नं.१ ने वादीस क.ग.नं. ८१२/१३ मध्ये विहिर खोदण्यास हरकत केल्याचे नाकारले नाही.

२४. याकामी नि.३/१७ खाली क.ग.नं. ८१२/१३ या मिळकतीत तो करत असलेल्या विहिरीचे छायाचित्र दाखल केले आहे. या छायाचित्रावरुन विहिरीचे

खोदकाम सुरु असल्याचे दिसत आहे. परंतु, सदरचे खोदकाम हे वादीच्या कथनाप्रमाणे क.ग.नं. ८१२/१३ मध्ये खरेदी केलेल्या मिळकतीच्या पूर्व बाजूस करत आहे. यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे दि. २६/०६/१९८९ च्या मिळकतीमध्ये वादीने कोणता ठराविक भाग खरेदी केला आहे त्याच्या चतु:सिमा नमूद केलेल्या नाहीत अथवा या मिळकतीत क.ग.नं. ८१२/१३ मध्ये इतर सहहिस्सेदारांचे सरसनिरस मानाने वाटप झालेले आहे असेदेखिल दिसून येत नाही. त्यामुळे वादीने क.ग.नं. ८१२/१३ मध्ये विहिरीचे खोदकाम करण्यासाठी सहहिस्सेदारांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

२५. वादी व प्रतिवादी नं.१ च्या कथनावरुन वादीने कोणतीही पूर्व परवानगी घेतल्याचे दिसून आले नाही. त्यामुळे वादीला क.ग.नं. ८१२/१३ मध्ये विहिरीचे खोदकाम करता येणार नाही. करिता या खोदकामास प्रतिवादी नं.१ ने केलेली हरकत ही वाजवी आहे. त्यामुळे वादीने केलेली मागणी याकामी मान्य करता येणार नाही. क.ग.नं. ८१२/१३ मध्ये वादी करत असलेल्या खोदकामामध्ये मनाई केल्यास त्याला कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही. याउलट सदर विहिरीचे खोदकाम केल्यास प्रतिवादीच्या क.ग.नं. ८१२/१३ च्या हिश्श्यास त्रास उद्‌भवू शकतो व भविष्यात त्यांच्यावर जबरदस्ती वाटणी लादली जावू शकते. त्यामुळे सदरची विहिर खुदाई केल्यास प्रतिवादी नं.१ ला अपरिमित हानी होण्याची शक्यता आहे. न्यायाचा झुकता तराजू वादीच्या बाजूने नसल्याने मी मुद्‌दा क्र.२ व ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविते व खालीलप्रमाणे आदेश पारित करते –

## आदेश

१. अर्ज नामंजूर.

२. अर्जाचा खर्च मूळ न्यायनिर्णयावर अवलंबून राहिल.

कोरेगांव {श्र.म. हिंगसे}
दिनांक २९/१०/२०१४ सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर, कोरेगांव